**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योगदिन संपन्न

अमरावती.

गतीमानतेच्या आजच्या युगात प्रत्येकावर कुठल्याना कुठल्या गोष्टींचा ताण आहे. मानसिक शांतता लाभावी आणि ताण कमी व्हावा या उद्देशाने योगाभ्यास महत्वाचा असून त्यातून शारीरिक स्वास्थ लाभते. अशा या आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून दिनांक २१ जून रोजी शासनाच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या योगदिनाच्या कार्यक्रमाला मा.कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर व प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला योग प्रशिक्षक म्हणून प्रा.सौ. शुभांगी रवाळे तर 'आहार व आरोग्य' या विषयावर मार्गदर्शक म्हणून डॉ. स्वप्नील शिरभाते व डॉ. उज्वला ढवळे लाभलेत. शासनाने निर्देशित केलेल्या योग कार्यक्रमाचा प्रसार व प्रचार व्हावां, तसेच योग करण्याची संधी व सराव सर्व नागरिकांना व्हावां या दृष्टीकोनातून तज्ञांच्या मार्गदर्शनात प्रात्याक्षिके करण्यात आली.

योगतज्ञ डॉ. शुभांगी रवाळे यांनी योगासन, प्राणायाम व ध्यानधारणा या विषयाची सखोल माहिती देवून उपस्थितांना योगाचे धडे दिले. पदव्युत्तर शारिरीक शिक्षण विभाग, विद्यार्थी विकास विभाग, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व रा.से.यो. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा विद्यापीठातील शैक्षणिक विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व अमरावतीतील नागरिकांनी लाभ घेतला. योग प्रशिक्षणानंतर लगेचच डॉ. उज्वला ढवळे यांनी दैनंदिन जीवनात आहार कसा घ्यावा, यावर सखोल मार्गदर्शन केले तर डॉ. स्वप्नील शिरभाते यांनी आरोग्याची नियमित काळजी घेण्याबाबतचे महत्व उपस्थितांना पटवून दिले.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. पाहुण्यांचे पुस्तक देवून स्वागत करण्यात आले. पाहुण्यांचा परिचय श्री राजेश पिदडी यांनी करुन दिला. डॉ. संजय गौतम यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ व प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते यांना टी-शर्ट भेट दिली. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी प्रास्ताविक करुन कार्यक्रमामागील भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी, तर आभार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत व या विभागाचे प्राध्यापक तसेच विद्यार्थी विकास विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. आंतरराष्ट्रीय योगदिनाला विद्यापीठाच्या विविध विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व शहरातील गणमान्य नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　　　दि. २१/०६/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

जनसंपर्क अधिकारी